नि.फौ.प्र.क्र. १०८/२०२०
सरकार वि. कुलदीप+ १
**निशाणी– १४**

अभियोग पक्षातर्फे **साक्षीदार क्र. ०२** ची शपथेवर साक्ष
मी याद्वारे शपथेवर निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | जोशीला बाळु टिपले, |
| वय | – | ३९ वर्षे, |
| व्यवसाय | – | गृहिणी, |
| राहणार | – | चंद्रपुर, ता. व जि. चंद्रपुर. |

**सरतपास अभियोग पक्षातर्फे श्रीमती. पी.बी.आमटे सरकारी वकिल यांचेतर्फे–**

मी दोन्ही आरोपींना ओळखते. आरोपी क्र. १ माझा भाऊ असुन, आरोपी क्र. २ माझी वहिणी आहे. घटना कोरोनापुर्वी हिरापुर येथे माझ्या शेतामध्ये दुपारी १२.३० ते ०१.०० च्या दरम्यान घडली होती. घटनेदिवशी मी, माझे पती व आणखी आमच्या ओळखीचे दोघे–तिघे शेतात गेलो होतो. सदर शेतामध्ये आरोपींच्या असलेल्या हिस्स्यातील भागात आरोपी काम करीत होते. त्यावेळी आरोपी क्र. १ व २ आम्हाला आडवे झाले व येथे जाऊ नका असे म्हणुन ''साली भोसडी असे वगैरे'' अशी शिवीगाळ केली व असे म्हणुन माझ्या पतीचा हात पकडला व तुम्हाला पाहुन घेतो, अशी धमकी देऊन आम्हाला निघुन जा म्हटले. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन येथे जाऊन रिपोर्ट दिली. आता मला जबानी रिपोर्ट व प्रथम खबर छापील अहवाल प्रत दाखविण्यात आले असुन, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यास अनुक्रमे **<u>निशाणी क्र. पी.१५ व पी. १६</u>** देण्यात आले. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते. पोलीस पंचनाम्यासाठी घटनास्थळी गेले होते किंवा कसे हे मला महिती नाही.

**<u>सरतपास समाप्त.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे श्री. मुसळे वकील साहेब यांच्यामार्फत–</u>**

२. माझे लग्न सन २००६ मध्ये झाले व तेंव्हा पासुन मी चंद्रपुर येथे राहते. हे म्हणणे खरे आहे की, हिरापुर येथील शेती वडिलोपार्जीत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ हा माझा एकमेव भाऊ आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नानंतर आमची आई आरोपी क्र. १ कडे राहत होती. हे म्हणणे खरे आहे की, शेती हिरापुर येथे होती. हे म्हणणे खरे आहे की, संपुर्ण शेती आरोपी क्र. १ च्या ताब्यात होती. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उता–यावर माझे नाव चढले होते व संपुर्ण शेतीचा ताबा आरोपीकडे होता. ताबा आरोपी क्र. १ कडुन घेण्याकरिता, हिस्सा वेगळा करुन ताबा घेण्याकरिता मी न्यायालयात दावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्याकडे ताबा घेण्याचा न्यायालयाचा कोणताही आदेश नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेपुर्वी मी शेतामध्ये कधी गेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे न्यायालयाचा आदेश नसतांना मी बळजबरीने ताबा घेण्याच्या उद्देशाने माझे पती व दोन तिन ईतर इसमांसोबत तथाकथीत घटनेच्यादिवशी शेतात गेले होते. हे म्हणणे खरे नाही

की, आम्ही शेतामध्ये जात होतो, त्यावेळी आरोपी क्र. १ ने आम्हाला न्यायालयीन आदेशाची विचारणा केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, तथाकथीत घटनेच्यादिवशी मी व माझ्या पतीने आरोपी क्र. १ व २ यांना शिवीगाळ केली व त्यांच्याविरुध्द खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ने माझ्याविरुध्द कोरपना येथील दिवाणी न्यायालयात ताब्याला अडथळा करुन नये असा दिवाणी दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये मी हजर झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दाव्यामध्ये आरोपी क्र. १ व माझा आपसी समझोता झाला व त्या समझोत्या नुसार एकमेकांविरुध्द असलेले खटले काढुन घ्यावे असे ठरले. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. १ ने माझ्याविरुध्द दाखल केलेली केस काढुन घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्या समझोत्यानुसार सदर खटला सुध्दा काढुन घेण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाचा ताबा घेण्याचा कोणताही आदेश आमच्याकडे नसतांना आरोपी क्र. १ कडुन बळजबरीने ताबा घेण्याच्या उद्देशाने तथाकथीत घटनेच्यादिवशी आम्ही शेता जाऊन आरोपी क्र. १ व २ यांना शिवीगाळ केली व त्यांच्याविरुध्द सदरची खोटी तक्रार पो. स्टे. गडचांदुर येथे दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितलेल्या शिव्या आरोपींनी मला दिली नसतांना सूध्दा मी पो.स्टे. गडचांदुर येथे खोटी तक्रार दिली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास समाप्त.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

| | |
|---|---|
| सा.वा.ब.दा.अ.क.केले | माझे समक्ष, |
| स्वा./– | स्वा./– |
| (आर.ए.रणनवरे)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोरपना<br>दि: ०३.०८.२०२६ | (आर.ए.रणनवरे)<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोरपना<br>दि: ०३.०८.२०२६ |